दिनांक ३१ डिसेंबर रोजी सेवानिवृत्त झालेल्या/होणाऱ्या कर्मचाऱ्यांना लगतच्या १ जानेवारी रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्तीवेतन निश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः वेतन-१२१९/प्र.क्र.१७२/टीएनटी-३**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार भवन,**
**मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक:- ०४ जून, २०२६**

**वाचा :-**

१. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकः वेतन २०२३/प्र.क्र.१३/सेवा-३, दि. १९/१२/२०२५
२. शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग, क्रमांकः न्यायाप्र २८२३/प्र.क्र.४३/ टीएनटी-३, दि. ०७/०७/२०२३
३. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः वेतन २०२३/प्र.क्र.१३/सेवा-३, दि.२८/०६/२०२३

**प्रस्तावना-**

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३१ डिसेंबर रोजी सेवानिवृत्त झालेल्या/होणाऱ्या कर्मचाऱ्यांना लगतच्या १ जानेवारी रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्तीवेतन निश्चित करण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर सूचना खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी क्षेत्रिय कार्यालयांच्या निदर्शनास आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:**

वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.१ अन्वये दिलेल्या सूचना खाजगी १००% अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत लागू करण्यात येत आहे.

२. वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.३ अन्वये दिलेल्या सूचना या विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ येथील शासन परिपत्रकाअन्वये खाजगी १००% अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत लागू केल्या आहेत. सदर वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.३ अन्वये दिलेल्या सूचना आता वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. १ नुसार दि.३१ डिसेंबर रोजी सेवानिवृत्त होणा-या खाजगी १००% अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही लागू करण्यात येत आहेत. सदर सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०६०४१८१११०४९२१ हा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ABASAHEB ATMARAM KAWALE
Date: 2026.06.04 18:12:51 +05'30'

**(आबासाहेब कवळे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल मुंबई.
२. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. महालेखापाल, (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई, नागपूर.
५. महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई, नागपूर.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी.
७. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. संचालक, विद्यापरिषद, पुणे.
११. संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई.
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१४. सर्व शिक्षणाधिकारी / शिक्षण निरीक्षक (माध्यमिक / प्राथमिक).
१५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१६. सर्व अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/माध्यमिक).
१७. वित्त विभाग (सेवा-३), मंत्रालय, मुंबई.
१८. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अर्थसंकल्प कार्यासन / संगणक शाखा, मंत्रालय, मुंबई.
१९. निवड नस्ती-टिएनटी-३.